महाराष्ट्र टाइम्स

# सर्पदंशावर मोनोव्हीलचा 'उतारा'

Jun 2, 2014, 12.00AM IST

ठाण्यातील क्रायसिस फाऊंडेशनने तयार केल्या ॲम्ब्युलन्स | अनुपमा गुंडे

वेळेत उपचार न मिळाल्याने सर्पदंश ठाणे जिल्ह्यातील अनेक आदिवासींच्या जिवावर बेतला आहे. या पेशंटना हॉस्पिटलपर्यंत नेण्याचा मार्ग सुकर व्हावा आणि या मधल्या काळात पेशंटला प्रथमोपचार मिळावेत यासाठी ठाण्याच्या क्रायसिस फाऊंडेशन या संस्थेने मोनोव्हील ॲम्ब्युलन्स तयार केल्या आहेत. पहिल्या टप्प्यात ३० आदिवासी पाड्यांना या ॲम्ब्युलन्स मोफत दिल्या जाणार असून, पुढे दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने ३०० गावपाड्यांपर्यंत त्या पोहचविण्याचा संस्थेचा मानस आहे.



सर्पदंशानंतर वेळेत उपचार न मिळाल्यायामुळे गेल्याच आठवड्यात विक्रमगड तालुक्यातील कल्याणी भोईर (१३) या मुलीचा मृत्यू झाला होता. दरवर्षी जिल्ह्यात अशा प्रकारे २० जणांचा बळी जातो. हे प्रमाण कमी करण्यासाठी मोनोव्हिल ॲम्ब्युलन्स विकसित केल्याची माहिती क्रायसिस फाऊंडेशनच्या अपूर्वा आगवण यांनी दिली. वजनाला अत्यंत हलकी असणारी ही मोनोव्हील ग्रामीण भागातील कोणत्याही रस्त्यावर चालू शकते. सायकल किंवा टू व्हीलरला जोडता येणारी या मोनोव्हीलमध्ये प्रसंगी पालखी करून पेशंटला वाहून नेता येते. सर्पदंशानंतर विष वेगाने शरीरात पसरू लागते, श्वसानास त्रास होतो. त्या परिस्थितीत प्राथमिक उपचारांसाठी मोनोव्हीलवर मॅन्युअल आणि ॲटोमेटिक व्हेंटीलेटर्सची सोय असल्याचे डॉ. सरिता पारीख, क्लोरा कोपील आणि ग्लेन फर्नांडिस यांनी सांगितले. सर्प पकडण्यासाठी जाळे, बूट व पिनॉक या आयुर्वेदिक गोळीचाही मोनोव्हीलमधील किटमध्ये समावेश आहे.

क्रायसिस संस्था सॉफ्टवेअर डेव्हलप करण्याचे काम करते. मिळालेल्या उत्पन्नातून जव्हार, मोखाडा, विक्रमगड या तालुक्यातील ३० पाड्यांना आम्ही हे कीट व ॲम्ब्युलन्स मोफत देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील ३०० गावांपर्यंत पोहचण्याचा संस्थेचा मानस आहे. मोनोव्हील ऑपरेट करण्याबाबत तसेच सापांबाबत जागृती होण्यासाठी जनतेला प्रशिक्षणाची गरज आहे, तेही संस्था करत असल्याचे अपूर्वा आगवण यांनी सांगितले.

ही मोनोव्हील तयार करण्याचा खर्च साधारणतः १० हजार रुपये आहे. दानशूर व्यक्ती पुढे आल्यास जास्तीत जास्त गावपाड्यांवर ही व्हील पोहचविणे शक्य होईल असे सांगतानाच ग्रामीण भागांत मोनोव्हील देण्याबाबत सरकारी पातळीवरूनही विचार व्हायला हवा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.